सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे**
**कस्तुरी बिल्डिंग, तळ मजला, जे. जे. टाटा मार्ग,**
**पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**दुरध्वनी क्र. ०२२- २२८८०११७/२२८८०१०६** Email- aotmdat@gmail.com

---

जा. क्र. संलेको/कोषा/सलेअ-१/अधिसंख्य पदे/२०२३/214 दिनांक : 27 JUN 2023

प्रति,

सहसचिव,
वित्त विभाग, कोषा प्रशा-३
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

विषय : अधिसंख्य पदावरील कर्मचा-यांना अदा करावयाच्या सेवाविषयक लाभाबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१.१२.२०१९.
२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब दि.१४.१२.२०२२.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१.१२.२०१९ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या/ जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या तसेच सदर शासन निर्णयापूर्वी जातप्रमामणपत्र अवैध ठरविल्यामुळे सेवा समाप्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांची सेवा अधिसंख्य पदावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत जे आधी घडेल तोपर्यंत नेमणूक करणेबाबत शासन निर्देश आहेत.

१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१.१२.२०१९ अन्वये अनुसूचित जमातीचे प्रमाणत्र अवैध ठरलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता अथवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवा निवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले व त्या नियुक्त्यांना सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय दि.२७.११.२०२०,दि.२८.१०.२०२१ व दि.१४.१०.२०२२ च्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आली.

२.महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब दि.१४.१२.२०२२ अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्यांच्या कालावधी करिता त्यांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याचे

तसेच त्यांना सेवाविषयक लाभ देण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

उपरोक्त बाबीच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१४.१२.२०२२ निर्गमित होण्यापुर्वीच्या कालावधीतील अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढी देताना तांत्रिक खंडाबाबत कोणतेही निर्देश दिल्याचे दिसून येत नाही. परंतु शासन निर्णय दि.१४.१२.२०२२ मध्ये अ.क्र.२ मध्ये नमूद केल्यानूसार १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुन्हा ११ महिन्यांच्या कालावधीकरिता मुदतवाढ देण्याबाबत निर्देश आहेत. परंतु प्रचलित नियम पाहता १ दिवसाचा तांत्रिक खंड असल्यास तो नियमीत केल्याशिवाय वार्षिक वेतनवाढ देय होणार नाही अशी या कार्यालयाची धारणा आहे. याबाबत अधिदान व लेखाकार्यालय व कोषागार कार्यालये तसेच विभागीय सहसंचालक कार्यालयाकडून वारंवार विचारणा होत असल्याने तात्काळ मार्गदर्शन होणेस विनंती आहे.

( वैभव राजेघाटगे )
संचालक,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण / औरंगाबाद/अमरावती/नागपूर/नाशिक/पुणे

प्रत : अधिदान व लेखाधिकारी, कार्यालय, मुंबई यांना माहितीसाठी रवाना. **(ई-मेल द्वारे )**